## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
**दिनांक ११/०३/२०१८**

**१) संगनमत करुन जुन्या वादाचे कारणावरुन इसमाला जिवानिशी ठार केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनाक ०९/०३/२०१८ चे २०.०० ते २०.३० वाजता दरम्यान यातील संशयीत आरोपीनी संगनमत करुन फिर्यादीचा मृतक मुलगा मुकेश भिमराव भैसारे वय ३६ वर्ष, रा. रमाबाई आंबेडकर वार्ड भंडारा यास जुन्या वादाचे कारणावरुन जिवानिशी ठार मारले फिर्यादीने तिचे मुलाचे खुनामध्ये वर नमुद संशयीत आरोपीतांचा हाथ असल्याचा संशय व्यक्त केल्याने फिर्यादी सौ. पुर्णाबाई भिमराव भैसारे वय ६५ वर्ष, रा. माबाई आंबेडकर वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०२,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनाक ०९/०३/२०१८ चे २२.३० ते २३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे वाहतुक सुरळीत डयुटी करित असतांनी यातील आरोपी क्र. १ ट्रक चालकास ट्रक साईडला घेण्यास सांगीतले असता त्याने अरेरावी करुन व आरोपी क्र. २ ते ५ यांना बोलावुन गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस शासकीय कामात अडथळा करुन अंगावर धावुन ढकलढुकल करुन तेरे को घर भेजता हु अश्या शब्दात धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३५३,१८६,१४३,१४७,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :-**

दिंनाक १०/०३/२०१८ चे ०९.२० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जखमी फिर्यादी सहपती रोहीनीप्रसाद मिश्रा वय ४५ वर्ष, रा. प्रगती कॉलोनी भंडारा याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६/५७२० ला समोरुन भिलेवाडा पेट्रोल पंपा जवळ येथ धडक मारुन फिर्यादीस गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. पुराम यांचे रिपोर्ट वरुन तसेच जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खैरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :-**

दिंनाक ०८/०३/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे घरी कोणीही हजर नसतांना फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, हिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**५) अल्पवयीन मुलाला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :-**

दिंनाक २६/०३/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा अल्पवयीन नातु वय १६ वर्ष, ३ महिने हा घरुन शाळेच्या पंटागणावर गेला परंतु सायंकाळ होवुनही घरी परत आला नाही, तेव्हा त्याचा नातेवाहीक व मित्रात शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**६) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :-**

दिंनाक १०/०३/२०१८ चे ०१.० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, ही घटना ता वेळी रात्र दरम्यान फोनवर दिसली म्हणुन तिला रागवुन विचारणा केली की ईतक्या रात्री तु घरा बाहेर काय करत आहे. नंतर रागाने फिर्यादी घरात गेले व बाहेर येवुन थोळया वेळाने बघीतले असता मिळुन न आल्याने शासन परिपत्रका अन्वये व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**७) वैनगंगा नदीचे पात्रात अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आले.  . :–**

दिंनाक १०/०३/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील अनोळखी मृतक इसम वय ३०ते ३५ वर्ष, वयोगटातील याचे प्रेत वैनगंगा नदीचे पाण्यातील पात्रात तरंगतांना मिळुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १०/०३/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन सिहोरा बसस्टॉप समोर आमरोडवर राज्य मर्ग क्र. १७१ वरील येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. लिल्हारे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक १०/०३/२०१८ चे १०.०० ते ११.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन बावनकर चौक तुमसर येथे आमरोडवर येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोशि. बाभरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०९/०३/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन बावनकर चौक तुमसर येथे आमरोडवर येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोशि. बाभरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**७) अवैध देशी दारु अड्डयांवर धाडी .  :–**

दिनांक १०/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, सिहोरा व लाखांदुर येथे अवैध देशी दारु अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभट्टी दारु किंमती ५००/–रु. १० लिटर ८००मिली लिटर देशी/ विदेशी दारु किंमती ३,१९८ असा एकुण ३,६९८/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १०/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनाकरीता ०२ ईतर वाहनांवरती – ५६ केसेस करण्यात आले आहे.


**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**


**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.